जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३०३/२०२२ दिनांक : ०६/१०/२०२२

# पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन तसेच नशामुक्तीकरिता विद्यार्थ्यांसमवेत जनजागृती रॅली.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक १/१०/२०२२ ते ७/१०/२०२२ पावेतो पोलीसांकडून विशेष सप्ताह राबविण्यात येत असून सदर मोहिमेअंतर्गत आज दिनांक ६/१०/२०२२ रोजी पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच मंत्रालयीन स्टाफकरिता आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरादरम्यान कार्यालयातील सर्व पोलीस अधिकारी/अंमलदार व कर्मचारी यांची तंत्र डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

त्याचप्रमाणे वालीव पोलीस ठाणेमार्फत नायगांव परिसरामध्ये व्यसनमुक्ती जनजागृतीकरिता शाळकरी विद्यार्थ्यांसमवेत रॅली काढण्यात आली. व्यसनामुळे व्यक्तीच्या आरोग्यावर तसेच कौटूंबिक जीवनावर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत सदर रॅलीदरम्यान बोर्ड तसेच घोषणेद्वारे जनजागृती करण्यात आली.



पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये आयोजीत आरोग्य शिबीर.




पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये आयोजीत आरोग्य शिबीरातील वैदयकीय अधिकारी.







वालीव पोलीस ठाणे अंतर्गत आयोजीत व्यसनमुक्ती जनजागृती रॅली.

----ooo----